बुधवार,
दि. २६ डिसेंबर, २०१२

# प्रतिवाद



## प्रकाशाचं बेट

महाराष्ट्रातील २७ हजार खेड्यांत अजून वीज नाही, हे वास्तव कोणी नाकारलेले नाही. गावकरी स्वतंत्रपणे वीजनिर्मिती अथवा त्यावर उपाययोजना करु शकत नाहीत, म्हणूच तर अनेक गावांत अजूनही रॉकेलचेच दिवे पेटतात. जेथे वीज पोहचली नाही तेथे गॅसिफायर, सोलर, बायोमास, बायोगॅस आदी माध्यमातून उर्जानिर्मिती होऊ शकते आणि त्यादृष्टीने प्रयत्नही सुरू आहेत. मात्र, अशी किती गावे आहेत की ज्यांनी स्वतःच वीजनिर्मिती केली. महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी असणाऱ्या कोयना धरणाच्या आत असणारे डिचोली गाव मात्र त्याला अपवाद ठरले. हे गाव 'प्रकाशाचं बेट' आहे, हे अनेकांना माहितही नाही. 'सीएसई मीडिया फेलोशीप' अंतर्गत लेखन आणि संशोधन करत असताना डिचोली गावाची ओळख पुढे आली. डिचोलीला भेट द्यायची म्हटले तर कोयना धरणातून लाँचमधूनच जवळपास दीड तासाचा प्रवास करायचा. हा प्रवास एवढ्यावरच थांबत नाहीत, तर लाँचमधून उतरायचे आणि एक डोंगर पार करायचा. यासाठी अडीच तास लागतात. विशेष म्हणजे हे गाव 'निर्मल ग्राम' झाले त्यावेळी ते कसे झाले हे ज्यावेळी अनेकांनी ऐकले, त्यावेळी प्रत्येकाच्या तोंडात बोटे गेली. कारण डिचोलीकरांनी केलेले कष्ट अतिशय अवघड आणि बिकट वाटेवरील होते हे प्रवासावरून लक्षात येते. अशा या डिचोलीची 'प्रकाशगाथा' अंधार असणाऱ्यां गावांसाठी 'प्रकाशाचं बेट' आहे. मात्र हे 'प्रकाशाचं बेट' कसं झाल, यासाठी थोडे पाठीमागे जावे लागते. एका बाजूला संपूर्ण महाराष्ट्र 'प्रकाशमान' करणारे कोयना धरण तर त्याच्याच आत असणारी डिचोली मात्र 'अंधारमय' ही कल्पनाच अनेकांना मान्य होत नव्हती. 'श्रमजीवी जनता सहायक मंडळा'चे बाळासाहेब कोळेकर यांना ही बाब खटकत होती. त्यांनी डिचोलीची ओळख पुसण्याचा प्रयत्न केला आणि त्यातही यश आले. बाळासाहेब कोळेकर यांनी निरगुडी आणि निलगिरी वनस्पतीच्या माध्यमातून 'गॅसिफायर प्रोजेक्ट'अंतर्गत वीजनिर्मिती करून गावचा अंधार कायमचा दूर केला. बायोगॅसही प्रकल्पही यशस्वी केला. आजमितीस डिचोलीत ८५ घरे प्रकाशाने उजळली असून ३१ खांबाना रात्रभर वीजपुरवठा होतो. प्रत्येक घरी निर्धूर चुल आणि गोबरगॅस आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा आधार घेऊन आपण सामान्य माणसांच जगण बदलू शकतो आणि ते कशा प्रकारे केले जाऊ शकते हे बाळासाहेब कोळेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दाखवून दिले. गेली अनेक वर्षे डिचोलीची यशोगाथा दिमाखात झळकत असताना मात्र काही दिवसांपूर्वी एक वाईट बातमी आली... अनेकांसाठी तो धक्काच होता. डिचोलीकरांसाठी ही बातमी जितकी आनंदी आहे, तितकीच ती दुःखदायीही आहे. कारण हेच 'प्रकाशाचं बेट' असणारी डिचोली विस्थापनाच्या वाटेवर आहे. जिल्हा प्रशासनाने त्याची तयारीही सुरू केली आहे.

**– मोहन मस्कर-पाटील**